## दिनांक २०.०१.२०२२ रोजीचे सर्वसाधारण सभेत पारित करण्यात आलेला तसेच त्याच सभेत कायम करण्यात आलेल्या ठरावाचा उतारा

(प्रशासकीय विषय)

**विषय क्रमांक ४:-** मौजे वरुडा सर्व्हे क्र.५/५ (भाग) बडनेरा या अभिन्यासातील रस्त्याच्या मधोमध असलेली विहीर बुजवीने बाबत.

**ठराव क्रमांक ४:-** सन्मा.सदस्य श्री.प्रकाश बनसोड यांचे दि.२२.१०.२०२१ चे प्राप्त पत्रानुसार मौजे वरुडा सर्व्हे क्र.५/५ (भाग) बडनेरा या अभिन्यासातील रस्त्याच्या मधोमध असलेली विहीर आहे व मंजुर अभिन्यामध्ये विहरीवरुन रस्ता दाखविण्यात आला आहे. त्यामुळे परिसरातील नागरीकांना रहादारी करणेकरीता अडचण निर्माण झाली आहे व या विहीरीमुळे कधीही दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकारणास्तव उक्त विहीर तातडीने बुजविणेबाबत आवश्यक असल्याचे नमुद आहे.

त्या अनुषंगाने प्रत्यक्ष मौका पाहणी केली असता सदर्हू विहीर ही जुनी असुन संपुर्ण विहीरीमध्ये मोठी झाडे निघाली आहे. नकाशात दर्शविल्याप्रमाणे सदर विहीर ही ७.५ मी.रस्त्याचे जागेमध्ये येते. विहीर रस्त्याचे मधोमध असुन धोकादायक असल्यामुळे सदर विहीर बुजवावी असे ही सभा सर्वानुमते ठरवित असुन सदर ठराव याच सभेत कायम करीत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर व कायम.

स्वा/-
नगरसचिव,
महानगरपालिका, अमरावती

स्वा/-
सभापती तथा महापौर,
महानगरपालिका, अमरावती

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.

date 20.01.2022 janral sabha